# अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा व कलावंत मेळावा.

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व कलावंत मेळावा १४ जून २००९ रोजी सायं. ६.३० वा. यशवंत नाटयमंदिर, माटुंगा येथे साजरा करण्यात आला. नाटयक्षेत्रातील विविध स्तरांवर उल्लेखनीय कार्य केलेल्या एकूण ६१ रंगकर्मींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. या सोहळयाला मुंबई येथील नाटयरसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. त्यावेळी विविध मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करण्यात आले.

## नाटय लेखन स्पर्धा

८९ व्या नाटय संमेलनाचा विशेष उपक्रम म्हणून नाटयलेखन स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत ५८ स्पर्धक सहभागी झाले. स्पर्धेसाठी आलेल्या अठ्ठावन्न नाटयसंहितातून परिक्षक मंडळाव्दारे निवडण्यात आलेल्या विजेत्यांना १४ जून रोजी झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक विजेत्यांची नावे खालील प्रमाणे :—

| पारितोषिक | रक्कम | नाटकाचे नांव | लेखकाचे नांव |
|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | रू. २१,०००/— | 'प्रेमरत्न' | श्री. वामन काळे, सांगली |
| व्दितीय क्रमांक | रू. ११,०००/— | 'संगीत ऐश्वर्यवती' | डॉ. श्रीकृष्ण जोशी, रत्नागिरी |
| तृतीय क्रमांक | रू. ७,०००/— | 'उंच माझा झोका गं !' | ॲड. शैलेज गोजमगुंडे |
| विशेष पुरस्कार | रू. ३,०००/— | 'द डेथ ऑफ ए कॉन्करर' | डॉ. समीर मोने, पुणे. |
| विशेष पुरस्कार | रू. ३,०००/— | 'दैवम् अचिन्त्यम्' | श्री. आनंद खरबस, सोलापूर |
| संगीत नाटकासाठी विशेष पुरस्कार | रू. ३,०००/— | 'तुकोबाची जिजा' | प्रा. एल. बी. पाटील, उरण. |

**उत्तेजनार्थ प्रमाणपत्र व रू. १,०००/— प्रत्येकी**

| नाटकाचे नांव | लेखकाचे नांव |
|---|---|
| 'ज्ञ' | प्रा. रविशंकर झिंगरे |
| 'भारत भाग्य विधाता' | श्री. जितेंद्र पाटील, मुंबई |
| 'मस्तकलंदर' | श्री. किरण पोत्रेकर. |

## नाटय परिषदेची स्वस्त आणि दर्जेदार नाटक योजना

नाटय परिषद सभासद आणि रसिकांसाठी नाटय परिषदेतर्फे स्वस्त नाटक योजना जून २००७ पासून सुरू करण्यात आली. तीच योजना याही वर्षासाठी सुरू ठेवण्यात आली असून गेल्या वर्षाप्रमाणेच रसिकांना दहा दर्जेदार कार्यक्रम फक्त ८००/६००/४००/३०० रूपयांत दाखविण्यात येत असून आतापर्यंत सात कार्यक्रम दाखविण्यात आले आहेत. एकूण १८३ सभासद या योजनेचा लाभ घेत आहेत.